
मूल्य रु.१० वार्षिक वर्गणी रु.१२०
Visit: http:/www.bsmdadar.com • Post Licence : INI No. 1262096

श्री. वसंत नामे, सौ. शुभदा नामे
पार्ले येथील सुप्रसिद्ध
पार्लेश्वर वडापाव सम्राट

स्वादिष्ट वडापाव
दादर (प)येथेही (सुविधासमोर)
समारंभासाठी बटाटावडा व समोसाच्या ऑर्डर्स स्वीकारण्यात येतील.
मराठा भुवन (सुभाष रोड), भोगले चौक (नेहरु रोड), विलेपार्ले
आणि आता मालाड (पूर्व) येथेही
९३२४०४७६१९, ९८१९९४३१०६

डिसेंबर २०१४ वर्ष १ • अंक १

# स्वयम्..

स्वयम् ला हार्दिक शुभेच्छा
मॉडर्न ऑप्टिशिअन्स् प्लस




## ब्राह्मण सेवा मंडळ संचालित उद्योग मंदिर










## घरगुती खाद्यपदार्थ आणि वेगवेगळ्या पिठांसाठी

# ब्राह्मण सेवा मंडळ - पदाधिकारी



**श्री. सतीश काशिनाथ मराठे**
अध्यक्ष



**श्री. भालचंद्र विश्वनाथ भेडसगांवकर**
विश्वस्त



**श्री. अनंत विश्वनाथ लिमये**
विश्वस्त



**श्री. विनायक कृष्णाजी लेले**
विश्वस्त



**श्री. पुष्कराज प्रभाकर सोमण**
कार्यकारी विश्वस्त




**श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
उपाध्यक्ष



**श्री. अनिरुद्ध सदाशिव गोडसे**
उपाध्यक्ष



**श्री. अभय अनंत सावरकर**
कार्याध्यक्ष



**श्री. विलास विठ्ठल वैद्य**
उपकार्याध्यक्ष



**सौ. कल्पना वसंत साठे**
प्रमुख कार्यवाह



**सौ. नीरजा दीपक करंदीकर**
संयुक्त कार्यवाह



**श्री. दिलीप देवदत्त शेटे**
संयुक्त कार्यवाह



**श्री. सतीश कृष्णाजी विद्वांस**
कोषाध्यक्ष



**श्री. योगेश यशवंत केळकर**
उपकोषाध्यक्ष

## कार्यकारी सदस्य



श्री. शंकर रामचंद्र देसाई



सौ. शिल्पा वसंत सहस्रबुद्धे



सौ. वृंदा विलास खानापूरकर



सौ. नीला विद्याधर वैशंपायन



श्री. कौस्तुभ वसंत महाजन



श्री.ज्ञानेश कमलाकर कुलकर्णी



श्री. दिनेश मुरलीधर गानू



श्री. घन :शाम त्रिंबक जोशी

## स्वीकृत सदस्य



श्री. महेंद्र मधुकर मणेरीकर



सौ.अधिता अर्चिस लेले



सौ. संपदा राजेंद्र भिडे

## “तर सांगायचं म्हणजे..”

प्रदीर्घ कालावधीनंतर ब्राह्मण सेवा मंडळ सहर्ष प्रकाशित करीत आहे, मासिक ‘स्वयम्’. यंदाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून, उपस्थित सर्व मान्यवर सभासदांच्या साक्षीने पहिल्या मासिक अंकाचे प्रकाशन झाले.

मधल्या काळात मंडळाच्या विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने भेटत होतो. पण आता प्रत्येक महिन्याला ‘स्वयम्’च्या माध्यमातून संवाद साधणार आहोत. प्रत्येक अंक वाचनीय असावा, संग्रही ठेवण्याजोगा असावा, यासाठी संपादक मंडळ कटिबद्ध आहे. यात मंडळाच्या उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती असेल. शिवाय वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध विषयांवरील लेखही असतील. आपल्या सर्वांचा यासाठी हातभार लागावा अशी इच्छा आहे.

मंडळातर्फे वधु-वर सूचक मंडळ चालवले जाते हे आपणा सर्वांना ज्ञात आहेच. त्यायोगे आपण ज्ञातीतील उपवर मुला-मुलींची माहिती, नोंदणीकृत सभासदांना उपलब्ध करून देत होतो. आता पुन्हा ‘स्वयम्’ मासिकातर्फे वधु-वरांची संबंधित माहिती सभासदांपर्यंत पोहोचवावी असा मानस आहे. अर्थात यासाठी आपले सहकार्य हवेच.

मध्यंतरीच्या काळात अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. त्यांपैकी एक आनंदाची गोष्ट म्हणजे, मंडळाने दुसऱ्या मजल्यावरील सभागृहाचे नूतनीकरण केले व हे सभागृह काळाची गरज आणि ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन वातानुकूलित करण्यात आले आहे. नुकताच कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम आपण या सभागृहात केला.

तसेच, मंडळाच्या उद्योग मंदिराने मार्च २०१४ पासून सकाळी पोळी-भाजी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आपणही आपल्या पोळीभाजीच्या घरगुती ऑर्डर्स देऊ शकता.

‘ग्रंथ तुमच्या दारी’ ही वाचक चळवळ मंडळाने हाती घेतली आहे. ‘कुसुमाग्रज प्रतिष्ठान’ तर्फे राबवण्यात येणाऱ्या या योजनेत वाचकांना विनामूल्य पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करून दिली जातात. फक्त रु. ३००/- अनामत रक्कम भरून सभासद व्हावे व भरपूर पुस्तके वाचावी अशी व्यवस्था आहे.

गेली २ वर्षे दादरचे रहिवासी श्री. श्रीकृष्ण जोशी, दर शनिवार-रविवार मंडळात श्रीमद्‌भगवत्‌गीता पठणाचे वर्ग विनामूल्य चालवत आहेत. गीतेचे १८ अध्याय स्पष्ट व योग्य उच्चारांसह म्हणण्याची संथा ते विद्यार्थ्यांना देतात. या वर्गात येण्यासाठी वयाची कोणतीही अट नाही. त्यांनी स्वत: निवृत्तीनंतर संपूर्ण गीता मुखोद्‌गत केली आहे. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी, शृंगेरीला जाऊन श्रीशंकराचार्यांसमक्ष गीता पठण केले आहे व त्यांच्या हस्ते प्रसाद व रोख बक्षीस मिळवले आहे.

वरील उपक्रमांच्या अधिक माहितीसाठी इच्छुकांनी मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधावा.

मंडळाचा आणखी एक उपक्रम म्हणजे नेरूळ, नवी मुंबई स्थित ‘आनंदाश्रम’. इथे सध्या ५० वृद्ध अतिशय गुण्यागोविंदाने राहत आहेत. उत्तम राहण्याची सोय, नियोजनबद्ध व्यवस्थापन व रुचकर जेवण यावर सगळेच खूश आहेत.

मंडळाची वेबसाईट www.bsmdadar.com अद्ययावत करणे चालू आहे. शिवाय ‘facebook’वरही मंडळाचा account आहे. आपण या संकेतस्थळांना अवश्य भेट द्या.

डिसेंबर २०१५-१६ हे मंडळाचे शताब्दी वर्ष आहे व हे वर्ष अतिशय धुमधडाक्यात साजरे करण्याची इच्छा मनी धरली आहे. शताब्दी वर्ष यशस्वीरित्या साजरे करण्यासाठी आपल्या मोलाच्या सूचना व सक्रीय सहभाग असावा असे मनापासून वाटते. अशा सूचना व आपल्या सहभागाचे स्वरुप मंडळाच्या कार्यालयात लिखित स्वरुपात कळवावे, ही विनंती.

**कृपया नोंद घ्यावी - नवीन स्वरुपातील ‘स्वयम्’ मासिकात राजकीय बातम्या, राशी भविष्य वा कविता छापल्या जाणार नाहीत. लेखांच्या निवडीबाबत संपादक मंडळाचा निर्णय अंतिम असेल.**

## आगामी कार्यक्रम

३ ते ९ जानेवारी २०१५ या कालावधीत कॅरम असोसिएशन आणि मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कॅरम स्पर्धेचे आयोजन केले आहे

आणि

सालाबादप्रमाणे यंदाही १६ ते २० जानेवारी २०१५ दरम्यान संक्रमण व्याख्यानमाला आयोजित केली आहे.


कार्यकारी संपादक

- **सौ. अधिता लेले**

स्वयम् संपादकीय मंडळ

- **सौ. कल्पना वसंत साठे**
- **श्री. विनायक कृष्णाजी लेले**
- **श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
- **श्री. अभय अनंत सावरकर**
- **सौ. अधिता अर्चिस लेले**
- **सौ. नीला विद्याधर वैशंपायन**
- **श्री. घन:श्याम त्रिंबक जोशी**

मुखपृष्ठ

- **प्रज्ञा हरणखेडकर**

अंक सजावट व मांडणी

- **एपीज डिझाईन ॲण्ड प्रिन्टस्**

संपादकीय विभाग पत्रव्यवहार

- **स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,**
  भवानीशंकर रोड, दादर (प),
  मुंबई ४०० २८
  ई-मेल : svayambsm@gmail.com
  वेबसाईट :www.bsmdadar.com

हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. , पाईप लाईन, अंधेरी पूर्व येथे छापून, ब्राह्मण सेवा मंडळ, भवानी शंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले.



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

## आर्थिक नियोजन

-जयंत विद्वांस

आपण सर्वजण बचत करत असतो. पण डोळसपणे गुंतवणूक करतो कां ? एजंट वर अंधविश्वासाने, तो सांगेल त्या योजनेमध्ये, त्या योजनेचा अभ्यास करुन आपल्या गरजांशी मेळ घालून गुंतवणूक करतो. अन्यथा याचा परिणाम असा होतो की निवृत्तीनंतरची पुंजी शेअरब्रोकरकडे डेरीव्हेटीव्हज्चे व्यवहार करण्यास दिली. टाय लावणारे मध्यस्थ काय व्यवहार करतात, माहित नाही आणि एका वर्षानंतर एक लाखाचे बारा हजार हाती आले. बरं, शेअर बाजारात तक्रार करायला गेल्यावर ब्रोकर, रोजच्या रोज कॉन्ट्रॅक्ट नोट तुमच्या हातात दिल्याचा पुरावा देतात. निवृत्ती नंतर आपल्या गरजा काय आहेत आणि किती जोखीम घेता येणे शक्य आहे हा विचार स्वत: केलेला नसतो. याच्यापुढे आणखी एक पाऊल म्हणजे व्हि. आर. एस्. किंवा स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर घरी न बसता, इतर गोष्टीत मन न गुंतवता केवळ वेळ काढण्यासाठी शेअर-बाजारांत दलालांच्या ऑफीसात जाऊन टर्मिनलसमोर बसतात. डे ट्रेडिंग करून पैसे गमावतात.

किंवा दुसरे टोक म्हणजे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सर्व रक्कम पोष्टात किंवा बँकेत मुदतठेवीमध्ये गुंतवतात. प्रत्येक वेळेस सुरक्षितता व जोखीम याचा मेळ साधणे गरजेचे असते. निवृत्तीनंतर सुद्धा २५ ते ३० टक्के रक्कम जोखीमयुक्त असण्यास काहीच हरकत नाही. जोखीमयुक्त म्हटल्यावर आपल्या डोळ्यासमोर फक्त शेअरबाजारच येतो. परंतु स्थावर मालमत्तेत (सदनिका किंवा दुकानाचा गाळा) गुंतवणूक केल्यास पेंशनप्रमाणे भाडे चालू रहाते व दरवर्षी भाडेवाढ होऊ शकते. तसेच, जागेची किंमत वाढल्यामुळे मुदलात वाढ होते.

आपल्या गुंतवणुकीवर महागाई व आयकर सापेक्ष परतावा (रिटर्नस्) किती असा विचार फारच थोडे लोक करतात. सुरक्षितता आपल्यात इतकी भिनलेली असते की जोखीमयुक्त म्हणून आपण जास्तीत जास्त रक्कम पोष्टात गुंतवतो. त्यावर व्याज ८.५० ते ९.०० टक्के मिळते व सध्या महागाई ७-८ टक्के कमी-अधिक कमीत कमी आयकर १० टक्के धरल्यास आपल्याला प्रत्यक्षात व्याज शून्य टक्के असल्यात जमा होते.

लहान मुलांच्या विमा पॉलिसी ह्या उपयुक्तता विचारांत न घेता केवळ भावनात्मक मुद्यांवर भर देऊन विकल्या जातात. मुदत संपल्यावर मिळणारी रक्कम, विमा पॉलिसीच्या सर्व तरतूदी (सर्व पाने) कोणीही वाचत नाही. पहिल्या पानावरचा नाव, पत्ता, हप्त्याची रक्कम, विम्याची रक्कम, नॉमिनी, इतके वाचून पॉलिसी कपाटात बंदिस्त होते. याच्या पुढची स्थिती म्हणजे शेअर ब्रोकर आणि बिल्डर बरोबर करायचे दस्तऐवज खूप मोठे असल्याने डोळे बंद करुन त्यावर सह्या केल्या जातात.

यावर माझा मित्र म्हणला, ॲग्रिमेंट वाचलं, पटलं नाही तर शेअर ब्रोकर किंवा बिल्डर तरतुदी थोडीच बदलणार आहे. मग उपयोग काय? आपण गुंतवणूकदार म्हणजे ग्राहक आहोत. आपल्याला काही हक्क आहेत याची आपल्याला जाणीवच नसते. आपल्या खात्यात शिल्लक रक्कम जास्त जमा असेल की बँकेतला आपला रिलेशनशीप मॅनेजर डिपॉझीट ठेवा म्हणून मागे लागतो किंवा म्युच्युअल फंडाची योजना गळ्यात मारतो. त्यातून सुटका झाल्यास आपल्या नात्यातला किंवा परिचित त्याचे आयुर्विम्याचे चालू उद्दिष्ट पूर्ण झाले नाही म्हणून तू माझ्यामार्फत सिंगल प्रिमियम पॉलिसी घे म्हणून सांगतो. मला ही गुंतवणूक योजना सोयिस्कर वा उपयुक्त आहे कां असा विचार तो करत नाही आणि आपणही करत नाही. कोणत्याही योजनेचे माहितीपत्रक दिले जात नाही. माहिती तोंडी सांगितलेली असते. ती १०० टक्के बरोबरच असेल असेही नाही.



वस्तूंमध्ये विविध ब्रँण्डस् जसे असतात तसेच गुंतवणूक क्षेत्रांतसुद्धा ब्रँण्डस् निर्माण झाले आहेत. प्रत्येक जण सांगतो आमची योजना इतरांपेक्षा खूप सरस आहे. म्हणजे अमुक म्युच्युअल फंड सांगणार की आमचा लार्ज कॅपचा फंड इंडस्ट्रीमध्ये सर्वोत्तम आहे. परंतु सर्व लार्जकॅप फंडचा पोर्टफोलिओ जवळपास एकसारखाच असतो.

पूर्वी गुंतवणूक योजना विकणारे (किंवा गळ्यात मारणारे) हे दलाल, एजंट ब्रोकर या नावाने ओळखले जात. आता नवीन इंश्युरन्स कंपन्यांनी यांना गोंडस नाव दिले आहे - इंश्युरन्स ॲडव्हायझर किंवा कंसल्टन्ट. नाव बदलले म्हणून माझ्या हिताचा सल्ला दिला जाईलच असे नाही. हे तर काहीच नाही. आपला कर सल्लागार (माफ करा पण वस्तुस्थिती नाकारता येत नाही) आयकर वाचवण्याचे विविध गुंतवणूक पर्याय न सांगता अमुक विमापॉलिसी मध्ये दरवर्षी इतकी रक्कम भरल्यास इतका कर वाचेल असे सुचवतो. विमा पॉलिसीच कां? कारण त्याच्या पत्नीच्या नावावर इंश्युरन्स एजंसी घेतलेली असते.

अशा परिस्थितीत असा कोणी आहे कां की जो प्रत्येक गुंतवणूक निर्णय आपल्या हिताचा विचार करुन घेईल. त्याला मिळणाऱ्या दलालीचा (जास्त किंवा कमी) विचार न करता माझी सोय किंवा गरज बघून मला योजना सांगेल. गुंतवणूक योजना गळ्यात मारणार नाही. अशी व्यक्ती जी गुंतवणूक क्षेत्रात माझा फ्रेंड, फिलॉसॉफर अँड गाईड असेल ती म्हणजे आर्थिक नियोजनकार.

आर्थिक नियोजनकार म्हणून काम करताना पुष्कळ कुटुंबांच्या गुंतवणुकांमध्ये विसंगती आढळून येतात. मग आर्थिक नियोजन म्हणजे काय ? आपले उत्पन्न - त्यानुसार खर्च, दरमहा करू शकणारी बचत, आपल्या पुढे उद्‌भवणाऱ्या गरजा, आपले राहणीमान, आपली पुढील आयुष्यातील उद्दिष्टे, आयकर इ. गोष्टींचा संपूर्ण कुटुंबासाठी साकल्याने विचार करुन आराखडा तयार करणे म्हणजे आर्थिक नियोजन. या मध्ये एक आर्थिक शिस्त अभिप्रेत आहे. अंथरुण पाहून पाय पसरणे अपेक्षित नसून आपले राहणीमान सध्यापेक्षा एक पाऊल पुढे कसे असू शकेल हा प्रयत्न असेल. फक्त नियोजन करुन न थांबता, आपल्या उद्दिष्टपूर्तीचा तसेच, बदलत्या राहणीमानाचा, वाढीव उत्पनाचा दरवर्षी

आढावा घेऊन त्यात आवश्यक ते बदल करणे अपेक्षित आहे.ज्या गुंतवणूका आत्तापर्यंत कमी परतावा देत असतील, त्या काढून घेऊन दुसऱ्या ठिकाणी गुंतवणूक करणे. ज्या उद्दिष्टांसाठी जेवढी रक्कम आवश्यक असेल ती मुदतीच्या आधीच जमा झाल्यास ती काढून घेऊन जोखीममुक्त करणे. या गोष्टींचा विचार वार्षिक आढावा घेताना केला जातो.

आपले बचतीचे सूत्र , उत्पन्न वजा खर्च बाकी बचत असे असते. त्याउलट आर्थिक नियोजनकार हेच सूत्र उत्पन्न वजा बचत (सुनिश्चित) बाकी खर्च असे फिरवतो. दरमहा बचतीची रक्कम निश्चित झाली की खर्चावर स्वाभाविक नियंत्रण येते.

आपला गुंतवणूक एजंट आणि आर्थिक नियोजनकार यांत खूप फरक आहे. हे एक वकील, डॉक्टर, सीए सारखे जगन्मान्य प्रोफेशन आहे. सीए प्रमाणेच ह्या व्यवसायात येण्यासाठी आर्थिक नियोजनकाराच्या हाताखाली काम करण्याचा तीन वर्षांचा अनुभव लागतो. या पेशाची तुलना बऱ्याचदा वैद्यकीय पेशाशी केली जाते. फॅमिली डॉक्टरसारखाच आर्थिक नियोजनकार तुमचा मित्र, मार्गदर्शक आणि सखा असतो. तुमच्या आर्थिक गुंतागुंतीच्या व्यवहारात तुमचा साथीदार बनतो आणि कदाचित तुमच्या कुटुंबातला एक सदस्य होऊन जातो. फॅमिली डॉक्टरप्रमाणेच हा फिनान्शियल डॉक्टर आपल्या कामाचा मोबदला तुमच्याकडून फी स्वरुपात घेतो. या उलट काही गुंतवणूक एजंट त्यांच्यामार्फत गुंतवणूक केल्यानंतर त्यांना मिळणाऱ्या कमिशनचा काही भाग तुम्हाला देण्यास तयार असतात.

पुढील भागात कुटुंबाचे आर्थिक नियोजन कसे करावे हे काही उदाहरणांसह पाहू.


**जयंत विद्वांस**
9892202011
jayantvidwans61@rediffmail.com



# श्रीराम मंगल कार्यालय, आपटे



व्रतबंध, साखरपुडा, विवाह, विवाहाचा २५ वा वाढदिवस,
षष्ट्यब्दीपूर्ती, विवाहाचा ५० वा वाढदिवस, पंच्याहत्तरी,
कौटुंबिक सम्मेलन, स्नेहसंम्मेलन, सहल, कार्यशाळा अशा सर्व कार्यासाठी
पुण्यापासून ११५ किमी, मुंबईपासून ८५ किमी, पनवेलपासून २२ किमी
द्वारकाधिश मंदिरापासून ५ कि.मी.अंतरावर असलेल्या
निसर्गसुंदर मंगलमय वातावरणात आपटे गावातील श्रीराममंदिराच्या प्रांगणात

**श्रीराम मंगल कार्यालय**

**१०० ते १२५ माणसांची**

**सकाळपासून चहा, नाश्ता, रुचकर जेवणाची सोय.**


**किफायतशीर दरात पुरोहीत, फोटोग्राफर,**

**मनोरंजक कार्यक्रमाची उपलब्धता.**

संपर्क : यशवंत बर्वे - ०९९६०६७१३८७   अनिल हर्डीकर - ९८१९४२१८५८

# सप्रेम भेट

**-चित्रा वाघ**



हिऱ्यांनी लखलखणारा हार नातीच्या गळ्यात घालणारी कृतार्थ आजी आणि आयुष्यभराचा ठेवा मिळवल्याच्या आनंदात तिच्या मिठीत शिरणारी, नववधूचा साज ल्यालेली तिची नात हे दृष्य जाहिरातीमधून आपण सगळ्यांनी अनेकदा पाहिलंय. आपल्या आवडत्या माणसांना भेटवस्तू देण्याच्या आणि त्यांच्या कडून त्या स्वीकारण्यातला आनंद प्रत्येकांनी कधी ना कधी अनुभवलेला असतो. रोजच्या आयुष्यात मात्र अनेक प्रसंगी भेटींची देवाण-घेवाण एक व्यवहार होऊन जाते. आणि उरते ती फक्त औपचारिकता. या व्यवहाराला मग अनेक पैलू असतात. म्हणजे प्रसंग काय आहे, ज्याला भेट द्यायची आहे त्याचे वय काय आहे, त्याला कसली आवड आहे, पैसे द्यायचे की वस्तू द्यायची, नव्याने विकत आणायची की कधीतरी आपल्याला मिळालेली वस्तूच नवीन कागदात गुंडाळून पुढे सरकवायची, या देवाणघेवाणीतून माझा नक्की काय फायदा होईल...असे काहीतरी.या सगळ्या व्यवहारात अजून एक गोष्ट खूप महत्त्वाची ठरते जी सहसा कोणी बोलून दाखवत नाही ती म्हणजे ज्याला भेट द्यायची त्याची आर्थिक आणि सामाजिक स्थिती. एखाद्या श्रीमंताच्या लग्नप्रसंगी भेट देताना बरेचदा महागड्या वस्तूंची निवड केली जाते आणि त्या उलट गरिबाकडच्या कार्याला एखादी साधीशी, कमी किमतीची वस्तू दिली जाते. खरं तर, श्रीमंतांकडे उंची वस्तूंचा ढीग पडलेला असतो. त्याला आपल्या भेटीने काहीच फरक पडणार नसतो. हे कळतं पण वळत मात्र नाही - खरं ना ? कधी आपण असा विचार केलाय का, की मला कुठली भेटवस्तू घ्यायला आवडेल किंवा त्याहीपेक्षा थोडा वेगळा विचार करुन पाहू. आजवर मला मिळालेल्या भेटींपैकी माझ्यासाठी खास ठरलेली नुसत्या आठवणीने चेहऱ्यावर हसू (.. आणि कधी आसू) आणणारी भेट कुठली होती? विचार केला तर लक्षात येईल की अशा खास भेटींची किंमत आपण पैशात नाही करु शकत आणि परतफेडीचा व्यावहारिक विचारही डोक्यात येत नाही. मी ही शांतपणे बसून या विषयी विचार केला तेव्हा दोन ते तीन प्रसंग ठळकपणे आठवले. खरंतर भेट देणारा हा प्रत्येकवेळी आपल्या निकट परिचियाचा, खूप जवळचा असतो असंही नाही. सुमारे दहा वर्षांपूर्वी आमच्याकडे घराच्या दुरुस्तीचं काम काढलं होतं. महिना दीड महिना रंगारी, कडिया, ईलेक्ट्रीशियन, प्लंबर यांचा घरात सतत वावर होता. या सगळ्या कामांमध्ये वेळकाढू काम म्हणजे बाथरुमचं. त्यात आम्ही पाईप्स, भिंतीच्या, जमिनीच्या टाईल्स, संगळंच बदललं होतं. त्यामध्ये एक ग्रानाईटचा छोटा प्लॅटफॉर्म बांधून त्याच्या मधोमध गोल बेसिन बसवायचं ठरवलं. साहजिकच ग्रानाईटचा मधला गोल भाग धागदार यंत्राच्या सहाय्याने काढून टाकण्यात आला आणि त्यात नवीन बेसीन बसवण्यात आलं. दिवसभर तो ग्रॅनाईटच्या कडा घासण्याचा आवाज, ठाकठूक चालच होतं. कडियाच्या कामाचा तो शेवटचा दिवस होता. यातील एक मुकेश नावाचा कडिया कितीतरी तास आमच्या गॅलरीत बसून काहीतरी काम करत होता. वाटेत इतका पसारा होता की मी दिवसभरात त्या दिशेला फिरकले सुद्धा नाही. नेहमीप्रमाणे चार वाजता त्या सर्वांना चहा, बिस्कीटं, फरसाण वगैरे खायला दिलं. थोड्यावेळाने काम संपल्यावर मुकेश हातात एक सुंदर काळंभोर अष्टकोनी पोळपाट घेऊन आला. त्याच्या सगळ्या कडा त्याने घासून छान गुळगुळीत केल्या होत्या. त्याला तीन छोटे सुबक पाय जोडले होते. मला म्हणाला, ''भाभी, मै कल से नहीं आऊंगा. ये आपके लिए बनाया है. आप इसपे रोटी बनाना.'' या अनपेक्षित आणि सुंदर भेटीनं मला खूप भरून आलं. ग्रॅनाईटच्या त्या कापून काढलेल्या तुकड्यावर दिवसभर जीवापाड मेहनत घेऊन त्याने माझ्यासाठी इतकी सुंदर भेट तयार केली होती. का? या प्रश्नाला काही उत्तर नाही. त्यावर मी कधी पोळ्या केल्या नाहीत पण दर दिवाळीला मी त्याच्यावर सुंदर रंगीबेरंगी रांगोळी काढते. त्या गडबडीत मी त्याच्याकडून फोन नंबर सुद्धा घेतला नाही. पुन्हा त्याची भेट झाली तर मी त्याला कदाचित ओळखणारही नाही. पण त्या अनोख्या भेटीतून तयार झालेले ऋणानुबंध कधीच विसरले जाणार नाहीत.

अशीच एक आठवण माझ्या शाळकरी वयातली. मे महिन्यात शाळेला सुट्टी पडली की आम्ही कोकणात गावी जात असू. त्या दिवसात आमच्या कलमावरचे आंबे उतरवायला आणि इतर कामांसाठी ठराविक लोकांची घरी ये-जा चालत असे. कोकणातल्या घरांना पुढे मागे अंगण. पुढच्या अंगणात आजोबा आरामखुर्चीवर बसत. बाजुला एका स्टुलावर पान-सुपारी व विड्या ठेवलेल्या असत.

काळ्या रापलेल्या रंगाचे, काटक पण पिळदार शरीरयष्टीचे कुळवाडी आजोबांच्या पायाशी नाहीतर अंगणाच्या दोन्ही बाजुला असलेल्या कट्ट्यांवर उकिडवे बसत. सगळे उघडे. कमरेला लंगोट नाहीतर पिवळ्या रंगाचं आखूड धोतर, डोक्याचं मुंडासं सोडून खांद्यावर टाकलेलं आणि कमरेच्या दोऱ्यात अडकवलेला कोयता असा त्यांचा सर्वसाधारण वेष.

त्यांच्यापैकी कुणाकुणाच्या बायका, आई-आजीच्या मदतीला, विहिरीवरून पाणी भरायला, भांडी घासायला, जमीन शेणाने सारवायला, मसाले कुटायला वगैरे यायच्या. या सगळ्या बायकांचा वावर असे पाठीमागच्या दारातून. त्यांच्यापाठोपाठ त्यांची पोरंसुद्धा येत. त्यात होती सुमी. माझ्याच वयाची पण तिसरीतच शाळा सोडलेली. तेल लावून चापून चोपून घातलेल्या दोन वेण्या, त्यावर अबोलीचा वळीसर, सावळा पण तरतरीत चेहरा आणि त्यावर पसरलेलं तोंडभर हसू.


ती मला रोज निरनिराळ्या ठिकाणी फिरायला न्यायची. कधी सड्यावर करवंद गोळा करायला, कधी कुणाच्या गोठ्यात नुकतंच

जन्मलेलं गायीचं पाडस बघायला, कधी खाडीच्या किनाऱ्यावर एखाद्या ओंडक्यावर बसून नेम धरून पाडलेल्या खोबऱ्या कैऱ्या खायला, कधी टेकडीवरची ब्रह्मदेवाची राई पहायला. मी तिला ट्रान्झिस्टरवर गाणी ऐकवायचे, पत्त्यांचे खेळ शिकवायचे, हिंदी सिनेमाच्या गोष्टी ऐकवायचे. दिवस मजेत जायचे.

आम्ही घरी परत जाण्याचा दिवस उजाडल्यावर मात्र तिचे तोंड पाऽर उतरुन जाई. मला आठवतं, तिच्या आईसारख्या इतरही काही बायका आमच्यासाठी भेट घेऊन येत. फडक्यांमध्ये गुंडाळलेल्या त्या भेटींमध्ये लाल तांदूळ, सातूचं पीठ, कुळीथ, छोट्या चवळीसारखे दिसणारे बडगे, वाल, यांचा समावेश असायचा.

सुमीची भेट मात्र स्पेशल असायची. गावभर हिंडून गोळा केलेल्या काजूच्या बिया सोलून, भाजून, त्याची रुमालात बांधून छोटीशी पुरचुंडी केलेली असे. एसटीमध्ये बसता बसता ती भेट सुमी हळूच माझ्या हातात देई. खमंग भाजण्याच्या नादात बरेच काळपट झालेले आणि फडक्यात गुंडाळल्याने मऊ पडलेले ते काजू अतिशय चविष्ट लागत. काळाच्या ओघात सगळीच समीकरणं बदलतात. माझं लग्न झाल्यापासून गावाला जाणं फारसं होतच नाही आणि गेलो तरी फार तर दोन-तीन दिवसांचा मुक्काम. सुमी लग्न करुन नक्की कुठल्या गावात आहे, कशी आहे, मला काहीच पत्ता नाही. मात्र त्या रस्त्यांवरुन फिरताना तिची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. आज शहरात अनेकदा आपल्याला मिळणाऱ्या भेटींमध्ये एकसारख्या दिसणाऱ्या, मोठ्या आकाराच्या, आकर्षक पॅकिंगमधील काजूंचा समावेश असतो. पण सुमीच्या घट्ट मुठीचा ओलसरपणा आणि ऊब असलेली ती काजूची पुरचुंडी आजही मनाशी बांधलेली आहे.

**-चित्रा वाघ**
9821116936
chiwagh@gmail.com



## नावात काय आहे ?

**- अनिल हर्डीकर**

हा नाना की काय? असा विचार समोरच्या गाडीत बसलेल्या माणसाकडे पाहून माझ्या मनात यायला आणि त्या माणसाने माझ्याकडे पहायला एकच गाठ पडली. त्यानं मला "अरे तैमूरलंगा ये ये" म्हणत दार उघडून बोलावलं. मी बसलो आणि सिग्नल पोलनं हरी झंडी दाखवली.

"ओळखलंच नाही तुला". मी स्पष्ट बोललो.

"मोठा माणूस तू"..नाना. तो माणूस नानाच निघाला.

"शाब्बास! मी पायपीट करतोय आणि तू गाडीतून फिरतोयस..." मी नानाशी इतकं मोकळं बोलू शकतो. मीच कशाला, आमच्या घरातले सगळेच. नाना माझ्या वर्गात होता. तसा माझ्या धाकट्या बहिणीच्याही वर्गात होता. आठवीत असताना माझा पाय मोडला होता तेव्हा नानानं बहाल केलेलं तैमूरलंग हे नाव माझ्या पायाबरोबरच जोडलं गेलं. नानाची शैक्षणिक कारकीर्द पाहता नानानं गाडी फिरवणं हे जरा जास्तीच होत होतं. ह्याचं सगळं आयुष्य दुसऱ्यांना नावं ठेवण्यात गेलं.

"काय करतोहेस सध्या?" मी त्याच्या एअरकंडीशन्ड कार, डेक आणि गाडीची कंडीशन पहात विचारलं.

"नावं ठेवतो".. नाना

"तो तुझा छंद आहे. पोटापाण्यासाठी काय करतोस ?"...मी

"कंपनीने स्वेच्छानिवृत्ती घ्यायला लावली. आता पोटापाण्यासाठीच नावं ठेवतो. VRS अगोदर घेतली असती तर बरं झालं असतं असं वाटतं कधी कधी"...नाना.

"म्हणजे VRSच्या पैशातून गाडी ?"...मी

"स्वेच्छानिवृत्ती देतात तेव्हा पैसे देत नाहीत. ही गाडी मी माझ्या व्यवसायातून घेतली, कर्ज न घेता".. नानानं वळण घेताना सांगितलं.

"व्यवसाय कसला?" ह्या माझ्या प्रश्नाला उत्तर न देता त्याचं व्हिजिटिंग कार्ड त्यानं मला दिलं. मी पाहिलं. माझी बुब्बुळं बाहेर येताहेत की काय अशी मला शंका आली. कार्डावरचा मजकूर मराठीत होता. 'नामानिराळा' खाली लिहिलं होतं, 'आम्ही नावं ठेवतो'. नानाच्या नावापुढं पदव्यांची खैरात होती. त्यातल्या काहींचा मला अर्थबोध होईना. प्रत्येक पदवीपुढे कंसात हॉलंड, फ्रान्स अशी नावं होती. नाना एवढा कधी शिकला? हा प्रश्न न विचारताच नाना म्हणाला, "मी शिकलेलो नाहीये हे बाहेर कुणाला माहित्येय? कोण माझी सर्टिफिकेटस् मागतोय ?"

"पण हे खोटं आहे".

"मान्य. पण कार्डाला वजन यायला नको ?"

मी नानाला मनोमन हात जोडले.

नानानं हसत विचारलं, "वत्सा, तुला वेळ आहे कां? स्वीट सिक्स्टिनमध्ये जाऊ.."

मी बसल्या जागी मनोमन उड्या मारल्या. स्वीट सिक्स्टिन हे महागडं हॉटेल. आम्ही त्याचा नीऑन साईनबोर्ड पाहिलेला. मेनूकार्ड बघण्याचा योग नानामुळे.

हॉटेल मॅनेजरने ज्या प्रकारे नानाचं स्वागत केलं ते पाहून नानाला घोसाळकरसरांनी वर्गाबाहेर काढल्याचं आठवलं.

आम्ही स्थानापन्न झालो. मेनूकार्ड न बघताच नानानं ऑर्डर दिली.

"त्याचं असं झालं. ज्या दिवशी कंपनीनं निरोपाचं पत्र दिलं त्या दिवशी सहोनासायेनानं सांगितलं अअनखो बोलावतोय."

"पण मग तू मधला अनाकलनीय मजकूर बोललास ती काय त्यांची नावं आहेत ?"

"हो. मी ठेवलेली."

"साहेबाची सेक्रेटरी म्हणजे **स**हन **हो**त **ना**ही **सां**गता येत **ना**ही आणि साहेब म्हणजे **अ**सून **अ**डचण **न**सून **खो**ळंबा".नानानं खुलासा केला. मी केबिनमध्ये गेलो. VRS अनपेक्षित नव्हती. पत्र हातात देऊन अअनखोनं विचारलं, "आता काय करणार आहात?"मी काहीच बोललो नाही. "नावं ठेवू नका निदान". अअनखो म्हणाला.

"अअनखोचं काही ऐकायचं नाही हा माझा जीवनसंकल्प असल्यानं मी तेच करायचं ठरवलं." "हा सुद्धा माझा क्लायन्ट. स्वीट सिक्स्टिन."

"नाना, तू अशी नावं ठेवून गाडी ठेवू शकतोस ?"

"त्यासाठी काही डिग्र्या घेतल्या. काही क्लृप्त्या केल्या. शेवटी धंदा आहे."

"उदाहरणार्थ ?"

"वास्तुशास्त्र, संख्याशास्त्र, रंगशास्त्राची पुस्तके वाचून काढली. ती ऑफीसच्या शोकेसमध्ये दर्शनी भागात ठेवली. तुला मी नावं ठेवण्यात किती फिंगरफास्ट आहे माहित्येय. पण मी आता नावं ठेवायला वेळ लावतो."

"बाय द वे, तू कसली कसली नावं ठेवतोस ?"

"हॉटेल्स, ब्यूटीपार्लर्स, दुकानं, डेअरीज, रिसोर्टस्, नवजात अर्भकं.."

"समजा, माझ्या हॉटेलला नाव द्यायचंय..."

"सर्वप्रथम माझी वास्तुशास्त्रतज्ञ माणसं तुझं हॉटेल पाहतील. मालकांच्या जन्मतारखा, व्यवसाय यांच्या लकी नंबर्सवरुन नाव ठरवलं जातं. ते कोणत्या रंगात असावं हे सगळं आमची कंपनी डिटेलमध्ये सांगते."

"चार्जेस कसे आकारता ?"

"अंथरुण पाहून पाय पसरतो. वीस जणांचे पगार काढायचे म्हणजे..."

नानाच्या एकेका वाक्यानं, माहितीच्या तपशीलामुळे मी अधिकाधिक आश्चर्यचकित होत होतो. "तुझ्या क्लाएंटस्ना पैसे घेऊन देऊ केलेली नावं सांगशील ?"

"अरे, अभिमानानं सांगेन. सायनच्या एका बारला नाव दिलंय 'एक बार फिर', पनवेलला नवा बार सुरू होतोय, नाव आहे 'दारुकाम'. सांगलीला नंदू रघुनाथ टिपणीस नावाच्या तरुणानं बार सुरु केला. बापानं पैसा दिला त्यासाठी नावात बापाच्या नावातला र तरी असावा अशी इच्छा होती. बारला नाव दिलं, 'नंदूरबार'."

“ नाना, तू हे रचून सांगतोहेस असं वाटतंय.”

“ त्याला काही इलाज नाही. सांगलीला जाऊन पिऊन ये..सॉरी पाहून ये. ”

“मॅचिंग सेंटरला नांवे दिली ‘रंगसंगती’, ‘रंग माझा वेगळा’. आपल्या वर्गात अब्दुलचाचाचा इब्राहीम होता बघ. तो डेअरी सुरू करणार होता इब्राहीम मिल्क सेंटर नावानं. मी म्हटलं नाव बदल. धोधो चालेल डेअरी. ‘दूध इब्राहीम’ नाव दिलं. पाणी घालूनही धंदा धोधो. नावात असतं सगळं.”

“बायका खरं तर नावं ठेवण्यात हुषार. पण ब्यूटीपार्लर्सचं किती क्लाएंटेल आहे माझ्याकडे. वाशीला ‘ब्यूटीदार’ नावाचं, ठाण्याला ‘नट्टापट्टा’ आहे तेही माझंच. लेडीजवेअरचे दुकान आहे लॅमिंग्टनरोडला ‘अय्या’ म्हणून तोही माझा क्लायंट. दादरला एक आहे ‘इनर कॉलम’ म्हणून.”

“नर्सरीजची नावं फुलराणी, हॅगींग गार्डन, ग्रीनरी अशी आहेत.”

“ दिल्लीचा एक क्लाएंट आला. ‘चाल’ माहित्येय तुला? लोखंडवालाला शूचं दुकान आहे. त्यानं सांगितलं दिल्लीत त्याचा भाऊ दुकान चालवतोय, त्याला नाव दिलं ‘सिंन्ड्रेला’. एकाला काळबादेवीला शू मार्ट सुरू करायचं होतं. बायकोचं नाव दुकानाच्या नावात यायला हवं म्हणाला. पैसेवाला माणूस. त्याच्याच बायकोचं नाव दिलं दुकानाला. वीस हजाराचं बील केलं.”

“ कमाल आहे.”

“ दुकानाचं नाव ‘shoe bha’ ठेवलं.”

मी टाळी दिली.

“ तुला वाटेल मी थापा मारतोय. पटवर्धन म्हणून पुण्याचे एक गृहस्थ आहेत. त्यांनी महाराष्ट्रीयन थाळीचं हॉटेल सुरू करण्यापूर्वी, पुणेकरानं मला नाव ठेवण्यासाठी पाचारण केलं. आता बोल.”

“ पुणेकरानं तुला नाव ठेवण्यासाठी बोलवावं हे म्हणजे मानाचं आहे.”

“मानाचं काही नाही. पुण्यात त्याचं कुणाशी जमत नाही. ह्या पटवर्धनना “द्या टाळी” असं येता जाता म्हणायची सवय आहे. तेच नाव दिलं..‘द्या थाळी’.”

“कोल्हापूरला माझे कोल्ड्रींक्सचे तीन क्लायंट्स आहेत. रसीला, थंडावा आणि गारवा.”

मी दाद दिली.

“तुला माहिती आहे..पुण्यात एक चायनीज, थाई, कोरियन फुडचे हॉटेल झालंय. त्याचं नाव मी ठेवलंय ‘स्वाद इस्ट’.”

“ तुला खूप आवडलेलं एखादं नाव?..”मी मुलाखत घ्यायच्या पावित्र्यात विचारलं.

“ सायकलीचं दुकान पेणला सुरू केलं मानकामे म्हणून माझा मित्र आहे त्यानं. नाव दिलं ‘सायकलॉजी’. नर्सरी स्कूल्सना किती नावं दिली ‘आजोळ’,‘कौतुक’ अशी.”

“ नवजात अर्भकांना काय नावं दिल्येस ?”

“ त्याचे क्लाएंटेल खूप कमी आहे. जवळजवळ नाहीच. आमचे चार्जेस परवडत नाहीत. नाही म्हणायला कम्पूचे मालक..”

“ कम्पू ?”

“कम्प्युटर इन्स्टिटय़ूट आहे पुण्यात. त्याच्या मालकाला, सुभाष जोशीला मुलगा झाला. मी नाव ठेवलं ‘जोशीला’. ”

“अलिकडे धंदा खूप वाढतोय. परवा एका सलूनला ‘माथेरान कटींग सलून’ असं नाव दिलं.

“इन्कमटॅक्स वाचवण्यासाठी दुसरी कंपनी फ्लोट करावी लागेल असं माझा सीए म्हणाला.”

“त्याचं नाव ठेवण्यासाठी पुन्हा मापं घ्यावी लागतील ऑफिसची.”......मी

“ वेडा की खुळा? नाव ठरलंही. नावात काय आहे ..! रअपिक्सशे.”

मी आ वासला.

“ नाही ना कळला अर्थ? तोंड मीट. ‘नावात काय आहे’ म्हणणाऱ्या शेक्सपिअरला उलटा केला. ”

**- अनिल हर्डीकर**
9819421858
hardikarsutradhar@gmail.com

## थो डे को डे

**यातील प्रत्येक शब्दाच्या शेवटचे अक्षर एकच आहे.**

१. आशाने गायलेले नाट्यगीत

□□ □ □□□

२. घे (हिंदी)

□

३. पिंजऱ्यातील कसलेला दिवंगत अभिनेता

□□ □□

४. विश्राम बेडेकरांचे गाजलेले नाटक

□□ □□□ □□□

५. भवानीशंकर पंडितांचे गाणे

□□ □ □□ □□

६. मोरुच्या मावशीचा गोरा गोमटा भाचा

□□□ □□□

७. गाजलेला हिंदी चित्रपट

□□

८. मातीची चूल या पुस्तकाचे लेखक

□□□ □□□

९. करुन गेलो गांव, अन् ह्याचो नांव

□□□ □□□

१०. फूटबालर

□□ □□

-(उत्तरे इतरत्र)



# कायदे उदंड झाले

**- मु. गो. सराफ**

कायदा पाळा गतीचा अशा शब्दांनी सुरू होणारी माधव ज्युलियन यांची कविता आठवायचं कारण म्हणजे परवाच वाहतुक नियम मोडणे आता महाग, मोटार वाहन कायद्याचा मसुदा जाहीर. कमाल तीन लाख रुपयांपर्यंत दंड, सात वर्षांपर्यंत तुरूंगवास अशा शीर्षकाची बातमी वृत्तपत्रात झळकली. मनात म्हटलं, चला वि. आ. बुवांच्या एका पुस्तकाचं नाव घेऊन सांगायचं तर कायद्यांमध्ये आणखी एकाची भर पडणार. सहज विचार केला तरी लक्षात येईल देश, राज्य, स्थानिक अशा विविध पातळ्यांवरचे कायदे एकत्र केले तर त्यांची संख्या लाखात मोजावी लागेल.

अशाच एका कायदे तज्ज्ञाने म्हटलंय when individual liberty is harmful, it is at Law that we must look व्यक्तिस्वातंत्र्य जेव्हा समाजाला नुकसानकारक ठरण्याची शक्यता निर्माण होते तेव्हा कायद्याचा आधार घ्यायची गरज पडते. स्वातंत्र्य म्हणजे केवळ स्वैराचार नव्हे, तर स्वत:हुन, स्वेच्छेने स्वत:वर घालून घेतलेली बंधने किंवा स्वयंशिस्त म्हणजे स्वातंत्र्य. मग कायदा म्हणजे सर्वस्व किंवा, कायदा केला म्हणजे सगळं काही संपलं का?

कायदा म्हणजे केवळ सुरूवात असते कारण त्याची अंमलबजावणी आणि तो पाळणं हे जास्त महत्त्वाचं आहे. म्हणून तर कुणी तरी लिहून ठेवलं आहे. - Law is not the right alone or might alone, but a perfect union of the two; it is the Justice speaking to the men throughthe voice of state' कायदा म्हणजे फक्त हक्क नव्हे किंवा दंडुकेशाही नव्हे तर दोन्हीचा अचुक समन्वय. कायदा म्हणजे शासनाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधणारा न्याय. सर्वसामान्यत: 'कायदा गाढव असतो' असा एक गैरसमज आहे. पण त्या संदर्भातही जुन्या कायदे तज्ज्ञांचं असं म्हणणं आहे की, Law, was never wise, but it was wiser than who admister it to seek to be wiser than law is the very thing which is forbidden by good Laws. कायदा कदाचित 'शहाणा' नसेलही पण तो त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांपेक्षा जास्त चतुर असतो. किंबहुना कायद्यापेक्षा कुणी वरचढ ठरू नये असे बंधन चांगल्या कायद्यांनी घातलेले असते.

कायदा करणे हे स्थानिक संस्था म्हणजेच महानगरपालिका, राज्य विधिमंडळे व देशाच्या संसदेचे काम असते. त्याची अंमलबजावणी करणे अशाच पातळ्यांवरील यंत्रणांची जबाबदारी असते. तर त्याचा अर्थ लावणे वकीलांचे व न्यायालयांचे काम असते पण या सगळ्या साखळीमध्ये सगळ्यात महत्तवाचा दुसरं तिसरं कोणी नसून तुम्ही आम्ही सामान्य जनता व नागरीकच असतात.

कायद्यांचं किंवा नियमांचं पालन करण्याची जबाबदारी जशी आपली आहे तशीच त्यासाठी इच्छा ही हवी. कायदे काही फक्त कपाटांची शोभा वाढविण्यासाठी नाहीत, तसेच कायद्याची अंमल बजावणी करणे म्हणजे पोलीसांनी दंडुका हातात घेऊन फिरणे नव्हे. कायदा माणसांसाठी आहे. माणसे कायद्यासाठी नाहीत. हे ही समजून घेणे गरजेचे आहे. सर्वसाधारण नागरिकांची मानसिकता कायदा पाळण्याची असते. कारण तो न पाळणे म्हणजे जणू पाप इतके ते पापभिरू असतात. खरं तर 'पाप करण्याआधीच ते भिरू होतात' असं कुणीतरी म्हटल्याचं आठवतं.

पण अलिकडच्या काही दशकात जवळजवळ सगळीकडेच नियम पाळण्यापेक्षा ते मोडण्याकडे नागरिकांचा कल वाढत चालला आहे. ही खेदाची गोष्ट आहे. पण त्याहीपेक्षा चिंतेची गोष्ट म्हणजे त्याबाबतीत आपण अग्रेसर आहोत. कायद्याचे उल्लंघन करण्यात व ते सांगण्यात आपल्याला भूषण वाटते. अगदी साधे व रोजच्या व्यवहारातले उदाहरण द्यायचे झाले तर रस्त्यावरून किंवा जिन्यावरून डाव्या बाजुने न जाणे यात आपल्याला काहीच चूक वाटत नाही. वाहतुकीचे नियम किंवा सिग्नल तोडणे, वेगमर्यादा न पाळणे, चुकीच्या बाजूने वाहने चालवणे अथवा ओव्हरटेक करण्यात आपण धन्यता मानतो. या बाबतीत त्यांना कुणी छेडले तर ' आम्हाला पोलीसही विचारत नाहीत मग तुम्ही विचारणारे कोण? असे समोरच्याच्या वयाचाही मान न राखता उद्दामपणे वागणारे महाभाग आहेत.



पण खरोखरच पोलीस विचारत नाहीत हे ही खरे आहे. अगदी अनंतचतुर्दशीच्या दिवशी विसर्जनाच्या गर्दीत एका स्कुटरवर नवरा, बायको व तीन मुले बसून चालली असताना पोलिसांनी दुर्लक्ष केल्याची घटना पाल्र्यात घडावी! अर्थात हे ही आता नित्याचे झाले



आहे. कारण पूर्वी काही प्रमाणात असलेले कायद्याचे राज्य आता 'काय'द्या चे झाल्यालाही बराच काळ झाला. केवळ पोलिसांच्याच नव्हे तर अनेक सरकारी अधिकाऱ्यांच्या हातात 'चिरीमिरी' दिली की आपण सुटू शकतो किंवा आपली कामे 'झटपट' होतात ही भावना सामान्यांच्या मनात खोलवर रुजली आहे. जन्माचा किंवा मृत्युचा दाखलाच नव्हे तर स्मशानात अस्थि मिळण्याचे दरपत्रकही ठरलेले आहे. यापेक्षा दर्दैवाची गोष्ट कुठली? अंमहबजावणी करणारी यंत्रणा व अर्थ लावणारी न्यायालये यापैकी कुणावरही जनतेचा विश्वास ठरलेला नाही. आज देशभरात विलंबित खटल्यांची संख्या ४० लाखांच्या वर आहे. Justice delayed is justice denied. हे तत्व आता नियम झाले आहे. तर 'कायद्यासमोर सर्व समान' यालाही हरताळ फासला गेला आहे. कारण "some" are 'more equal' than ' "others" हे आजकालचे कटु सत्य आहे. पण त्याहीपेक्षा Jail is the Rule and Bail is an exception हे न्यायाचे तत्व आता बरोबर उलट झाल्याने खून, बलात्कार, कोट्यावधींचे भ्रष्टाचार अशासारख्या गंभीर गुन्ह्यांना सहजासहजी जामीन मिळत आहे.

न्यायालयात मिळतो त्याला न्या का म्हणावे लागते याबद्दल एक खूप जुना किस्सा आठवतो. लंडनमध्ये एक तरूण व होतकरू वकील टॅक्सीला हातकरत म्हणाला, please drive me to the old Belly - "Court of Justice" त्यावर ड्रायव्हर हसत म्हणाला, Sorry Sir, in England there is only court of Law मग आपल्याकडच्या न्यायदानाबद्दल काय बोलायचे?

ज्या इंग्लंड, अमेरिका, युरोप बद्दल आपण सतत बोलत असतो तिथे सर्व कायदे व नियम कसोशीने व मनापासुन पाळले जातात. अगदी रहदारीचे रोजचे नियमही त्याला अपवाद नाहीत. स्वानुभवावर आधारित एक-दोन उदाहरणे द्यायची तर अगदी पहिल्यांदा आम्ही अमेरिकेत गेलो असताना रात्री ११ वाजता पिक्चर बघुन येताना मुलीने School Ahead-go slow बोर्डाजवळ गाडी थांबवली. "अगं रात्री इतक्या उशीरा कुठे असते शाळा?" असे मी विचारताच ती म्हणाली, Sign board wants me to wait अगदी दोन वर्षांपूर्वी आम्ही पहाटे चार वाजता सॅन हो जे विमानतळाकडे येत असतानाही आमचा टॅक्सी ड्रायव्हर प्रत्येक ट्रॅफिक सिग्नल पाळत होता व रस्त्यावर दाखवलेली वेगमर्यादाही.

आम्ही नायगारा धबधब्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभे असतानाही एकेका मिनिटात ५०-१०० गाड्या समोरून जात होत्या. आपण रस्ता कसा काय क्रॉस करायचा असे वाटत असतानाच एकदम एका गाडीवाल्याने आम्हाला जायची खूण केली आणि सगळ्या गाड्या पूर्णपणे थांबल्या आणि आम्ही निरधास्तपणे रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला गेलो. अशा एका रविवारी फ्लोरिडामध्ये आम्ही नाटक पहायला जाताना रस्त्यात अपघात झालेला होता, पण येताना त्याचा मागामुसही नव्हता. असे मोठे पाश्चात्य देश तर राहू देत, अगदी हाँगकाँग, बँकॉक, दुबई, मस्कत, सिंगापूरमध्येही हॉर्न वाजवणे हा प्रकार नाही. इतकेच नव्हे तर चालणाऱ्याचा व सायकलवाल्यांचा रस्ता फक्त त्यांचा असतो. त्याचप्रमाणे अपंगांसाठी राखीव असलेल्या जागेत कुणीही चुकूनसुद्धा गाडी पार्क करत नाही. In America residences are known as citizens, in u.k. subjects and in France taxpayers while in India they are citizens subject to taxes असं ज्या करप्रणालीबद्दल म्हटलं जातं त्या क्षेत्रात पण आपले असे वैशिष्ट्य आहे. Tax avoidance is illegal but tax eva-sion is legal असं Income Tax Act च सांगतो. तिथेही मध्यमवर्गीय पगारदार १९ प्रकारांनी कर वाचवतो असं अनेक वर्षांपुर्वी झालेल्या सर्वेक्षणात आढळून आलं होतं. मग उद्योगपती व राजकारणी यांच्याबद्दलच्या सुरस कथा तर सर्वश्रुत आहेतच. त्याच्याहीपुढे जाऊन जगजीवनराम सारखा ज्येष्ठ नेता १० वर्षे इन्कमटॅक्स रिटर्न भरायला विसरतो हे सामान्य करदाता अजूनही विसरला नसेल. अशा पार्श्वभूमिवर दुबईसारख्या टिकलीएवढ्या देशात एका पैशाचा कर भरावा लागत नाही असे ही तर अरबी भाषेतील सुरस कथा वाटली तर त्यात काय आश्चर्य?

आम्हाला कॉमर्स कॉलेजातील एक चार्टर्ड अकांउंटंट अध्यापक सांगायचे Whenever there is any new laws are passed there is crop of experts to find out loopholes from them. And experts earn money from common man's ignorance. पण त्याचबरोबर Igno-rance of law is not an excuse आणि it is never an excuse अशी दोन खूप पुरातन काळापासून चालत आलेली तत्वे आहेत. पण कायदा हा पाळणाऱ्यांसाठी नाही हेही एक व्यावहारिक सत्य आहे.

पुन्हा एकदा निर्माण होणाऱ्या नवीन कायद्याकडे वळायचं तर अलिकडेच सार्वजनिक जागी धुम्रपान करण्यासाठीचा दंड रु.५,००० वरून रु.२०,००० करण्यात आला पण "हर फिक्र मै धुए में उडाता चला गया" म्हटल्यावर त्याची तरी कुणाला आहे "देणम् नास्ती घेणम् नास्ती" आहे की नाही "आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहिकडे?"

थोडक्यात काय? कायदे उदंड झाले, पळवाटा शोधावया, वेळ-इच्छा आहे कुणाला, ते सगळे पाळावया? कायद्याच्या जाळ्यातून छोटे मासे निसटून आणि मोठे जाळ्यासकट पळून जातात. हेच खरे.

**-मु.गो. सराफ**
9930775375, 02226836069
mukundsaraf@gmail.com

# नातीगोती

## गेले ते दिन गेले..

**-गणेश आचवल**



तुम्ही आम्ही एकमेकांशी जोडले जातो ते कोणत्या ना कोणत्या तरी नात्यानेच. मग कधी ते रक्ताचं नातं असतं, तर कधी मैत्रीचं. पण मुळात या नातसंबंधांचा पाया असतो प्रेम आणि गाभा असतो विश्वास. पूर्वी आपल्याकडे एकतर एकत्र कुटुंब पद्धती होती. साधारणपणे मराठी माणूस हा हावा गावात विखुरलेला होता. खास करून कोकणी प्रांतात. तिथल्या विविध भागात. तेव्हा आपल्या गरजा मर्यादित होत्या. शेजारधर्म या गोष्टीला सुद्धा महत्त्व होते. त्या काळात घरी शिजवलेल्या स्वयंपाकाला महत्त्व होते. पोळी हे पक्वान्न समजले जात होते. रोजच्या जेवणात पोळी असेलच असे. भात आणि एखादी भाजी किंवा रात्रीच्या जेवणाला भात आणि कुळथाचे पिठलं असा बेत असायचा. या गोष्टी तुम्ही सुद्धा ऐकल्या असतील तुमच्या आजी-आजोबांकडून.

गाव, घर, अंगण, अंगणात तुळी वृंदावन, शेणाने सारवलेली जमीन. पहाटे लवकर उठून सडासंमार्जन करायचे, देवापाशी दिवा लावायचा, तुळशीला पाणी घालायचे. मग जवळच असलेल्या देवळात जायचे असा दिनक्रम सुरू व्हायचा. अर्थात हे मी सांगितले ते गावाकडचे जीवन.

शहरात त्या वेळी उंच इमारती नव्हत्या. चाळ संस्कृती होती, त्यामुळे इथेसुद्धा शेजारधर्माला महत्त्व होते. शहरात माणसे शिक्षणासाठी आली तरी त्यांच्या गरजा मर्यादितच होत्या, वाहनांचा विकास झालेला नव्हता. त्यामुळेकुठे जायचे ते चालतच जावे लागायचे. बस, ट्रे यांची संख्यादेखील मर्यादित होती. असे वाचलले आहे की मुंबईत म्हणे रोज सकाळी सफाई कामगार रस्ते पूर्ण धुवायचे. आश्चर्यच वाटेल आता हे वाचून. आजोबांकडून ऐकले होते की तेव्हा ट्राम्स होत्या. मुंबईत शिक्षणासाठी माणसे यायची, ती मामा मावशीकडे वास्तव्य करायची. घरच्या पाच-सहा जणांच्या कुटुंबात एका माणसाचे जेवण कुणाला जड वाटत नव्हते. जो मुलगा शिक्षणासाठी मुंबईत येई, तो घरातील काम आपणहून करायचा. मुख्य म्हणजे अनेकदा असेही असायचे की कोणाच्या तरी नात्यातला एखादा मुलगा, त्याला सुद्धा मुंबईतला माणूस घरात ठेवायचा. वार लावून जेवण्याची पद्धत सुद्धा होती. आता वार लावणे याचा अर्थच आजच्या पिढीला माहीत नसेल. एखादा होतकरू मुलगा एखाद्या ठिकाणस्वास्तव्य करायचा पण जिथे तो वास्तव्य करायचा तिथे तो रोज जेवत नव्हता. आठवड्याचे सात दिवस तो विविध कुटुंबात वेगवेगळ्या वारी जेवायला जायचा. पण त्यात कोणालाच अडचण वाटत नव्हती आणि कोणी आपल्याकडे राहायला वा जेवायला आलाय म्हणून कोणाच्या कपाळावर आठी येत नव्हती. अगदी पूर्वीच्या लग्न समारंभांचा किंवा मुंजींचा विचार केला तरी चाळीतल्या मजल्यावर सुद्धा मुंज लागत होती.

पूर्वी चाळीमध्ये मजल्यावर जी घरे होती, त्या दोन शेजाऱ्यांच्या घरांमध्ये जो दरवाजा असायचा तो म्हणे अशा समारंभाला उघडला जात होता. लाडू, पुरणपोळ्यांसारखी पक्वान्न आणि चिवडा सुद्धा घरी केला जात होता. सलोख्याचे, एकोप्याचे वातावरण होते. दिवाळी सारख्या सणाला पदार्थ किंवा फराळ विकत घेतला जात नव्हता तर तो घरीच केला जात होता.

काळ बदलत चालला. आज आपण जागतिकीकरण, खाजगीकरण यांच्या दिशेने पावले उचलू लागलो. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले असे म्हणता म्हणता माणसे एकमेकांपासून दुरावत चालली. ब्लॉकमध्ये राहायला गेल्यावर आमच्या मनाला सुद्धा आम्ही 'ब्लॉक' केले. पूर्वी १२वी च्या पुस्तकात एक कविता होती. त्या कवितेत गावातून शहरात स्थायिक झालेल्या कवयित्रीची व्यथा मांडली होती. शहरातील फ्लॅटमध्ये माझे मन 'फ्लॅट' तर होणार नाही ना अशी भीती त्यात व्यक्त केली होती.

वाचकहो, आज खरोखरंच नाती, कुटुंब या गोष्टी टिकून आहेत का, नात्यांचा जिव्हाळा, मायेचा ओलावा टिकून आहे का याविषयी विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**-गणेश आचवल**

athatharvbharadwaj@gmail.com

# व्हॅ‘नीला’

## लक्षात राहिलेले दुर्लक्षित

**-नीला वैशंपायन**

काल चर्चगेटहून दादरला येताना मुंबई सेंन्ट्रलला ‘‘ए, रबर ले, क्लीप ले, पिन ले’’ अशी नेहमीची आरोळी पण एका वेगळ्या धारदार आवाजात ऐकली. या आरोळीला हेल नव्हते. आवाजाने साहजिकच लक्ष वेधून घेतले. अतिशय बारीक चणीची, खात्रीने कर्तबगारीची खूण असलेल्या पातळ त्रिकोणी नाकाची, नुकतेच आईपण लाभलेली एक मुलगी. बाई म्हणू हवं तर! आपल्या महिन्या-दोन महिन्याच्या बाळाला खांद्यावरच्या झोळीत गेऊन पोटापाण्याला लागली होती. तिला नुकत्याच लाभलेल्या आईपणाच्या साऱ्या खुणा शरीरभर उमटल्या होत्या. तिला पाहून काही वर्षांपूर्वी पाहिलेल्या अशाच एका मुलीची आठवण झाली. ट्रेनमधलीच विक्रेती. शेवटची पाहिली तेव्हा आपल्या चार-पाच वर्षाच्या मुलीसाठी घेतलेला भरपूर फ्रिल व लेस असलेला फ्रॉक आपण फक्त ७५ रुपयात घेतला हे मोठ्या कौतुकाने दुसऱ्या विक्रेतीला दाखवत होती. तिच्या डोळ्यातली अपार माया, कौतुक तिच्यातल्या फक्त ‘आई’चं दर्शन घडवत होती. गेली ६ ते ७ वर्ष दिसली नाही ती. कुठे गेली असेल, तिचं पुढे काय झालं असेल, असे अनेक विचार मनात आले.

मुंबई म्हटलं की लोकल गाड्यांशिवाय पर्याय नसतो. दिवसाचा ठराविक वेळ रेल्वेशी जोडलेला असायचाच. अशीच एकदा स्टेशनबाहेर उभी होते. थंड दूध विकणाऱ्या स्टॉलजवळ दोन-तीन लहान मुलं खेळत होती. त्यांचे बहुधा आई-वडिल शेजारी गजरे करीत बसले होते. दोघा गिऱ्हाईकांनी थंड दुधाच्या रिकाम्या बाटल्या त्या फळकुटावर ठेवल्या आणि पैसे देऊन ते निघणार इतक्यात या मुलांनी हळूच त्या बाटलीच्या तोंडापाशी धरलेली साय बाटलीत बोट घालून काढली आणि पटकन् चाटून टाकली. ते दृश्य बघून मन खरंच कळवळलं. त्या मुलांना एखाद-दोन बाटल्या विकत घेऊन द्याव्यात असं मनात येऊन मी पुढे होऊपर्यंत तो दुकानदार त्यांच्यावर खेकसला. पोरांना बहुधा हे नेहमीचंच असावं. हसत हसत ती पोरं दूर पळाली.

सावळा वर्ण, कुरळे केस, हिरवट पिंगे डोळे आणि सगळ्यात लक्षवेधी ‘प्रमाणबद्ध साच्यातून काढल्याप्रमाणे वाटावेत असे सुंदर सर....ळ दात’. पाच-सहा वर्षांची ही मुलगी भीक मागत असे. काही महिने दिसली, नंतर दिसेनाशी झाली. ‘समतोल’ सारख्या संस्थेने तिला पुन्हा तिच्या किंवा एखाद्या चांगल्या घरी पोहोचवलं असेल अशी आशा करण्यापलिकडे माझ्या हातात काहीच नाही.

तशीच अजून एक मुलगी आठवली. तिला बहुदा बळजबरीने भीक मागण्याच्या धंद्याला लावलं असावं. दोन चार ठिकाणी हात पसरुन झाल्यावर स्वत:वरच चिडत, आक्रस्ताळेपणानं मधेच फतकल मारुन बसली. बहुदा आजही उपास या जाणीवेने तिला रडू येत असावं.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी संध्याकाळी नवी साडी नेसून माझ्या नवऱ्याबरोबर बाहेर पडले होते. अशीच एक ८-१० वर्षांची मुलगी हातात झेंडूची तोरणं घेऊन ‘‘घेणार कां’’? विचारत पुढे आली. मानेनेच नकार देत मी पुढे झाले. पुढच्या वळणावर नवरा आणि मी वेगवेगळ्या वाटेने जाणार होतो म्हणून उभे असताना पुन्हा जवळ येऊन ती विचारती झाली ‘‘ताई, तोरण’’? मी जरा चिडूनच म्हटलं, ‘‘एकदा नको सांगितलं नां’’? माझा नवरा मला म्हणाला, ‘‘कशाला चिडतेस? तुझी दिवाळी.. तिची नाहीये कां? तिच्या नशिबी सणावारी वणवण या वयातच लिहिली आहे. घेऊ नको, नको असेल तर, पण चिडून बोलू तरी नका न अशी’’. तापल्या तव्यावर पाणी पडल्यासारखं चर्र व्हावं तसं काळजात चर्र झालं. लगेच वळून खूप शोधलं, पण नाहीच दिसली कुठे. कुठे पळाली कुणास ठाऊक. तिच्यापेक्षा थोडी लहान दुसरी मुलगी भेटली. सोलापूरकडच्या होत्या त्या मुली. गुपचूप तिच्याकडून तोरण घेतलं आणि सोसायटीच्या गेटवर लावायला गुरख्याकडे देऊन टाकलं. गेली ४-५ वर्षे दरवर्षी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हटकून त्या मुलीची आठवण येत असे. दिसेल त्या, त्या वयाच्या मुलींकडून १-२ तोरणं घेऊन कुठेतरी लावायला देते.

ऑफिसात काम आटपून चर्चगेटच्या वाटेवर चालताना एकदा एक भिकारी वाटावा असा माणूस चालला होता. फाटके कपडे, खंगलेले शरीर, निस्तेज डोळे आणि दिवस ढकलणे या वाक्प्रचाराची प्रचिती देणारी देहबोली... कसं कोण जाणे पण माझा त्याला पाय लागला. सवयीने माझ्याही नकळत माझ्या हाताच्या नमस्कार सदृश हालचाली झाल्या आणि नजर एकाच क्षणी त्याच्यावर पडली. स्वत्व विसरलेल्या त्या माणसाच्या डोळ्यात निमिषार्धात मला एक चमक दिसली. मी अगदीच क्षुद्र, निरुपयोगी कवडीमोल नाहीये ह्याची जाणीव मला त्या चमकलेल्या डोळ्यात दिसली. दोनच क्षण त्याची देहबोली सुद्धा बदलली. म्हणावं तर एका अतिशय क्षुल्लक कृतीमुळे त्याच्याच जो बदल झाला, त्यामुळे मलाच बरं वाटलं. जर हा माणूस परमेश्वर किंवा देहातल्या अनाम शक्तीत अस्तित्व मानणारा असेल तर, ‘कोणीच नाही’ पासून ‘कोणीतरी आहोत’ इथपर्यंतचा एका निमिषार्धात झालेला प्रवास, तो पुढे चालू ठेवू शकेल कां?

वाटेत येता जाता अनेक जण आपल्याला भेटतात. काही पक्के लक्षात राहतात, तर काहींची नोंदही घेतली जात नाही. आणि कां ठेवावी? सर्वसामान्यच आपण. काही माणसं तेव्हाच विशेष होतात जेव्हा त्यांच्या वागण्याचा आपल्या आयुष्यावर बरावाईट परिणाम होतो. पण ही सगळी तर अशी दुर्लक्षित माणसं.. आपल्या आयुष्यात, वैयक्तिक नाहीच, पण सामाजिक आयुष्यातही त्यांचं काही स्थान नाही. पण तरीही स्वत:चा अशा एक ठसा उमटवून गेलेली, आपल्यापैकी प्रत्येकांना कधी ना कधी भेटलेली.

**-नीला वैशंपायन**

wneela2gmail.com

# माझी सहल

-डॉ. अशोक कोर्डे

पावसात मनमुराद भटकणं हे ज्याला आवडत नसेल त्या माणसाचं मनच निर्जिव असणार. माझं आडनावच कोर्डे असल्याने माझं मन व शरीर पाण्याकडे निर्झरासारखं वहात जातं! ह्या ऋतूत पिकनीक स्पॉटला जाण्याऐवजी कुठंतरी हटके, निर्जन जागी जायचं. आपल्याला 'काय डॉक्टर' म्हणून हाळी देणारं कोणी नसेल, तिथे जाऊन मनसोक्त (खरं म्हंजे 'धांगडधिंगा')वावरायचं हे दरवर्षी मी 'पंढरीच्या वारीप्रमाणे न चुकता करतो. डोंगर, धबधबे, पायवाटा, शाकारलेले झोपडे आणि पावसाचा अविरत कोसळणारा प्रताप. अगदी समर्थांचा ''धबाबा तोय आदळे.....!'' असं वातावरण म्हंजे विटेवरलं परब्रह्म !

ह्यावर्षी माळशेज घाटापलिकडे एका छोट्या घाटीत जायचे ठरले. नेहमीचे यशस्वी कलाकार तर ठरलेलेच होते. ज्या ठिकाणी जायचे होते तेथे शासनाची 'वस्ती तेथे एस्टी' पोहचणारी असल्याने लाल-पिवळ्या बसने जायचे ठरले. फक्त एक वांधा आलाच. Doctor proposes but patient disposes हा वैद्यकीय क्षेत्रातला नियम अपवाद सोडून आडवा आला. मला ठरल्या वेळेस निघता येईना. मग मित्र सकाळीच पुढे गेले व मी दुपारी माझी रुग्णालयातील कामे निस्तरून जायचे ठरवले. त्या शुक्रवारी सकाळपासून मुम्बैत मनस्वी उकडत होतं. शरीरावर स्वेदाभिषेक सतत चालू होता. दुपारची साडेचारची यश्टी पकडायची, त्याप्रमाणे काळ-काम-वेग चालू होतं. ऐन वेळी नेमकं कोणी त्या दुपारी आलं नाही हे समाधान मानून सायन हॉस्पिटलच्या एस.टी स्टँडवर कसाबसा आलो न् तेवढ्यात बस आलीच. बसमध्ये शिरता शिरताच पावसाने सर्व प्रवाशांना झोडपायला सुरूवात केली. बसमध्ये तर सर्वच वातावरण कोंदट झालेलं. पावसामुळे खिडक्या बंद. काचा बंद असूनसुध्दा पावसाचे पाणी आत येतच होतं. खिडकीशी बसलेले पाशिंजर कडेला बसले. खिडक्याजवळ कोणी नाही. मी अेंट्रीलाच हे पाहिले न् एका खिडकीशी अेक मुलगी बसली होती, तिच्या शेजारी बसलो. काचेतून पाणी आत न आल्याने ती सीट पूर्णपणे सुकलेली होती.



पाच-सात मिनिटात प्रवास सुरू झाला. ड्रायव्हर अन् कंडक्टर ह्यांच्यात फारच गंभीर चर्चा चालली होती. तिकिट देण्यासाठी कंडक्टर येईचना. मग कळले, कोणाचीच तिकिट काढलेली नाहीयेत, कारण दोघांच्या गप्पा परळपासून चालल्यात. ठाणे मागे पडले. पाऊस बसवर पाण्याचे आसूड ओढत होता. वाऱ्याने 'आज बस उडवतोच' असा मानस केला असावा. अंधारलेल्या आभाळात जमीन दिसावी म्हणून कडकडणाऱ्या वीजेचा उजेड नाममात्र दिसत होता आणि आमचा रथ चालवणारा सारथी युगंधर श्रीकृष्णासारखा अचल, एकाग्र होऊन वाहन सहजतेने चालवत होता. कंडक्टरला आपल्या कर्मयोगाची जाण आली अन् ''तिकिट, तिकिट'' करत तो प्रत्येकाकडे येऊ लागला. मी माझं रितसर तिकिट काढलं. सर्व पैसे प्लॉस्टिकच्या पिशवीत पॅक केले. माझ्या शेजारच्या खिडकीजवळ बसलेल्या त्या मुलीकडे केलं. इतक्या वेळ बाहेर बघणारी ती मुलगी आता कंडक्टरकडे बघू लागली. तिचं पैशाचं पाकिट सीटवरील रॅकवर असलेल्या पाकिटात होतं. मी बाजूला झालो. ती उभी राहिली, अन् तिचा विस्फोटच झाला. वर तिची पाकिट असलेली पिशवी तिथे नव्हतीच. क्षणार्धात रडकुंडीला आलेली ती मुलगी सर्व ठिकाणी शोधाशोध करू लागली. बसमध्ये प्रकाशाचा उजेडच(!) होता. जे दहा-बारा पॅसेंजर होते ते सर्व बस खालून वर धुंडाळू लागले, पण पर्स-पिशवी सापडेना. मग सहेतू-निरहेतू प्रश्नाची बाराखडी झाली. अखेरीस तिची पिशवी चोरीला गेल्याचे सर्वानुमते ठरले! कंडक्टरला तिकिट देण्याची काळजी अन् त्या मुलीला तिकिट घेण्याची काळजी! त्या संवादाला वाचा फुटेना. कुठं जायचं ते गाव मला कळेना. चौकशीअंती कळाले की मी उतरणार होतो त्याच्या अगोदर आहे. दानशूर वगैरेचा आव न आणता मी तिच्या तिकिटाचे पैसे कंडक्टरला दिले. तिला हायसे वाटले. कंडक्टरची सुटका झाली. बस-प्रवासी मात्र चौर्य-नाट्य फारच लौकर संपलं म्हणून निराश मनाने हिरमुसले.

बस प्रवास सुरू होताच. कातरवेळ मध्यरात्री सारखी वाटत होती. तिकिट अन् हिशोब झाल्याने बसमधले होते-नव्हते ते दिवे बंद झाले. एका अंधाऱ्या प्रचंड बोगद्यातून आमची यात्रा सुरू होती. जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्यांच्या उजेडाचा झोत सर्रकन बसमधून जात होता. शेजारी बसलेली ती पोरगी मला धन्यवाद तरी म्हणेल असं वाटत असतानाच, काचेवर डोकं ठेवून ती ओक्साबोक्सी रडायला लागली. मी सांत्वनपर तिला म्हणालो ''अग, जाऊ दे आता. आता घरी पोहचते आहेस नां? ह्यापुढे सामानाची काळजी घे''. पण रडणे चालूच. बसमधला अंधार, पोरगी ढसाढसा रडतेय, प्रवासी (दिसत नसले तरी) बघत असणारच. मीच कसंच कसं झालो. दोन-चार वेळा विचारल्यावर म्हणाली ''त्या पिशवीत दोन हजार रुपये अन् शाळेची पुस्तके होती, आता मला सर्व भरून द्यावं लागणार''. मी विचारलं, ''तू शाळेत शिकतेस? मग दोन हजार घेऊन मुम्बैत का आलीस? घरी माहिती आहे''? माझ्या प्रश्नावलीचा पेपर तिने हुंदके सोडवायला घेतला.

तिचं नाव होतं शांती घोरकणे. ती मुरबाड मधून बी.ए. झालेली. गावाजवळच्या शाळेत शिक्षिका होती. घरात आई, वडिल, धाकटी बहीण. वडील रोजंदारीवरील कामगार. थोडीफार शेती. शांतीला शिक्षणाची आवड म्हणून शिकली. बी.ए. झाली. शाळेत नोकरी मिळाली. शाळेत अल्पावधीत तिचा उत्कर्ष झाला. हेडसरांनी तिच्यावर खूप जबाबदाऱ्या टाकल्या. शाळेच्या ग्रंथालयासाठी, प्राथमिक वर्गाच्या मुलांसाठी गोष्टीची पुस्तके आणण्यासाठी दोन हजार रुपये देऊन मुम्बैला खरेदीसाठी पाठवलं होतं. १५ ऑगस्टला ग्रंथालयाचा प्रारंभ करायचा शाळेचा उपक्रम ठरला होता आणि आता पैसे चोरीला गेले. ह्या कथेवर माझा हळूहळू विश्वास बसत गेला. तरी पण मी विचारलं, ''मग पुस्तकं कुठं आहेत?'' तर ती म्हणाली, ''ज्यांच्या कडून पुस्तके आणायची होती तो माणूसच भेटला नाही, म्हणून मी परत जातेय''. त्या अंधारमय प्रवासात ती काळी की गोरी तेच दिसत नव्हतं तर मी काय विश्वास ठेवणार? तिच्या बोलण्यातला प्रामाणिकपणा मात्र मला जाणवत होता. तिच्या समोर यक्ष प्रश्न होता, दोन हजार कसे देणार? एसटी ने आता हमरस्ता सोडून गावातले रस्ते पकडले होते. खड्ड्यांचे स्पीड-ब्रेकर असल्याने बसचे सर्व सांधे वाजत होते तर प्रवाशांचे घट्ट होत होते. शांती घोरकणेला घर जवळ आल्याच्या खूणा दिसायला लागल्या. तिची शाळा पण दाखविली. तिचं टेंशन फारच वाढायला लागलं. तशी म्हणाली, ''माझ्या घरी येता? तुमचे तिकिटाचे पैसे देते''. मी म्हटलं ''पैसे मग बघू...पुढे मला जायचय त्याचं काय?'' ''आज रातच्याला वस्ती करा न उद्या जावा''. तिच्या उद्गारासरशी मी चमकलोच. मग तिनं, मी राहल्याने तिचा व माझा पुढील प्रवासाचा त्रास कसा वाचेल ते सांगण्याचा प्रयत्न सुरू केला. जेथे माझे मित्र वाट पहात असतील, ते बस स्टॉपवर कसे येतील ह्या कोड्यांची उत्तरे मी सोडवत होतो. पण त्या शांतीचं गाव, शाळा, घर हे बघण्याचं औत्सुक्य मनात वाढत होतं. जरा मी बोलत नाही असं बघून तिनं सांगूनच टाकलं, आता हा ओढा गेला की आपण उतरायचं. माझी दोलायमान अवस्था क्षणार्धात संपली. मी तिला नकार देत म्हटलं, ''येताना नक्की येतो''. ती हिरमुसली. उतरण्यापूर्वी तिला दोन हजार रुपये प्लॅस्टिक पिशवीत टाकून दिले, अन् म्हटलं, मला फोन कर. ती 'धन्यवाद' म्हणून उतरली. बसमध्ये दिवे लावल्याने ती आता स्पष्टपणे दिसली. पंजाबी ड्रेस, लांब केस, सावळी, आत्मविश्वासपूर्वक नजर व धारदार नाक, कृश देहयष्टी असलेली ती बस जाईपर्यंत उभी होती. मी दिलेले पैसे हातात घट्ट धरून.

पंधरा-वीस मिनिटांत मी मित्रांच्या गराड्यात पोहोचलो. त्यांचा उत्साह-मूड उच्चतम पातळीवर पोहचला होता. मला उशीरा आल्याबद्दल शिव्यांच्या ओव्या म्हणण्याची स्पर्धाच चालली होती. माझा बस प्रवास सांगण्याचा प्रयत्न फोल ठरणार ह्याची खात्री असल्याने मी गप्पच होतो.

नंतर महिना-दीड महिना त्या शांती घोरकणेचा फोन-पत्र काही नाही. तोपर्यंत घरातल्यांना दोन हजार मी असेच पोरीला दिल्याची बातमी चांगलीच कळली. तुम्हाला असे कसे फसवतात सर्व? (असा प्रश्न बायकोशिवाय कोण विचारणार?) इ.इ. प्रश्नांचा गोळीबार झाला. पण एके दिवशी शांती घोरकणेचा फोन आला. सविस्तर माफी मागून झाली. मग म्हणाली ''आमच्या हेडसरांशी बोला''. फोनवर हेडसर बोलू लागले, ''तुम्ही शांतीबाईंना मदत केली नसती, त्या बाईंनी आत्महत्या केली असती. फार मनाला लाऊन घेतलन् त्यांनी. तुमची



रक्कम शाळा भरून देईल. आम्ही तुम्हाला भेटायला येतो. का पंधरा ऑगस्टला तुम्हीच येता झेंडावंदनाला, प्रमुख पाहुणे म्हणून ''? मी म्हटलं, ''मोठ्या माणसांची कामं मला येणार नाही. खरं तर माझ्यापेक्षा फार मोठी व्यक्ती तुमच्या समोर आहे, शांती घोरकणे. तिच्याच हस्ते झेंडा ऊंच फडकवा आभाळात''.

मग शाळेच्या नावे एक पत्र टाकलं. त्यात दोनच ओळी लिहिल्या.....ग्रंथालयाच्या पुस्तकांची स्वातंत्र्यदिनी भेट - 'एका सहप्रवाशाकडून'!

**-डॉ. अशोक कोर्डे**

९८२०४३५२०४

The END

कथापूर्ती

## संसार हा सुखाचा

**-अनिल हर्डीकर**

''उद्या तुझा काय प्रोग्राम आहे?''
''कां?''
''सहज''
''आराम करणार आहे उद्या. आ रा म''
''व्हेरी नाईस''
हा शिरच्छेदाचा संकेत. मी ओळखलं. माझं उत्तर चुकीचं नव्हतं. पण काही प्रश्न अनुत्तरित राहिले तर उत्तरात फेकबदल करण्यात हित असतं. पण मी गाफील क्षणी चूक केली होती. शनिवारच्या रात्रीचं वागणं तसं घसरण्याचं.
''का गं? काही विशेष?''
''तसं विशेष काही नाही पण महत्त्वाचं मात्र आहे. उद्या तू मोकळा असशील तर मला माळा साफ करायचा आहे.''
''कर ना, मी कधी अडवलंय?''
''मी चढू माळ्यावर?''
''चंद्रावर जातात महिला. तू माळ्यावर नाही जाऊ शकत?''
माझ्या या 'जागेला' हिनं नाक मुरडलं आणि ठेवणीतलं अश्रूंचं अस्त्र काढून म्हणाली, ''मक्ता घेतला मी, घर माझ्या एकटीचच आहे.''मग मी म्हटलं, ''एवढा विनोदही कळत नाही तुला?''
''नको त्या वेळी विनोद कसे सुचतात तुला?'' असं म्हणून तिनं दिवा मालवला.
रविवार उजाडला. रविवार सकाळ इतका आळसावलेला असतो, आज ही मात्र चार्जड् होती. चहा झाल्यावर मटा लोकसत्ताच्या 'पेपराची ही घडी अशीच राहू दे' म्हणत तिनं हाती धरुन झाडू मलाच 'झाडायला' सुरवात केली. मला माळयावर चढवण्यात ती यशस्वी झाली. शिडी काढून तिने माझे परतीचे मार्ग कापून काढले. माळा हा परिसर माझ्या परिचयाचा होता. गेल्या सफाईदिनानंतर आज पुन्हा झाकपाक केलेल्या माळ्यात मी शिरत होतो. धूळ आणि जळमटं यांपासून बचावासाठी मी नाकाला रुमाल बांधला होता. अधिक घट्ट बांधला असता तर धूरच काय प्राणवायूही नाकात गेला नसता. मी माळ्याचा ताबा घेतला आणि हिनं मला खालून 'हाकायला' सुरवात केली.
''ही केरसुणी घे. ओलं फडकं देतं त्यानं पूस आणि उठवळासारखं काम करू नकोस...'' वगैरे वगैरे.
माळ्यावरच्या चीजा 'जैसे थे' अवस्थेत आरामात पडल्या होत्या. पूजेचा चौरंग होता, चार पाट होते, पाळणा होता, आईस्क्रीमचं पॉट होतं, बेडपॅन होतं, कुबड्या होत्या. मध्यंतरी म्हणजे सुमारे ५ वर्षांपूर्वी मी पायाचं हाड मोडून घेतलं होतं. त्या दिवसांची ती लाकडी आठवण माळ्यावर जपली होती. गेल्या सफाईदिनाला त्या कुबड्या फेकून देण्याचा प्रस्ताव मी मांडला होता तेव्हा कुबड्यांच्या रिसेल व्हॅल्यूपेक्षा युटीलीटी व्हॅल्यू अधिक आहे असा युक्तिवाद विरोधी पक्षानं करुन माझा प्रस्ताव फेटाळला. तो तोकडा वाटून की काय,''तुझा पाय भविष्यात कधीही घसरु शकतो'' असा उप-युक्तिवाद करुन ''नरो वा कुंजरो वा'' प्रमाणे अप्रत्यक्षपणे माझ्या चारित्र्याविषयीही मतप्रदर्शन केले होते. आणि माळ्यावरच्या कुबड्यांची कां अडचण होतेय? असा विचार करुन त्या कुबड्यांना माळ्यावर राहू दिलं. बड्याबड्यांना नेहमीच झुकतं माप दिलं जातं हे मला ठाऊक होतं, कुबड्यांनाही ते असतं हे त्यावेळी कळलं. माळ्याच्या एका कोपऱ्यात काही पितळ्याचे डबे, काही चिनी मातीच्या बरण्या, काही डबे, पत्र्याचेही दबा धरुन बसले होते. बऱ्याच दिवसांनी कां होईना पण विचारपूस केल्याने त्या सर्व चिजांवर एक प्रकारचं तेज आलं होतं. हिनं चिरंजीवांची थ्रीव्हिलर माळ्यावर टाकण्याचा मनसुबा बोलून दाखवला. अलीकडे चिरंजीवांना थ्रीव्हीलर मध्ये थ्रील वाटेनासं झालं. त्या अडीअडचणीत थ्रीव्हिलरला 'वरची' जागा मिळाली. मी एकेका आयटमचं नाव पुकारलं की त्याला खाली न उतरवता तिथेच राहू देण्याचा निकाल ही जाहीर करायची. मी म्हणालो, ''पाळणा कशाला आता ..'' तर ही म्हणाली, ''दुसऱ्यांचा विचार नको कां करायला?'' मी विचार केला. माझाच. म्हटलं, पाळणा जागचा हलला नाही तरी चालेल, हिचा 'सल्ला' नको.
आईस्क्रीम पॉट, बेडपॅन, चौरंग, पाट सर्वांचं रिमूव्हल बरखास्त झालं. मग माझाही पुरुषार्थ दुखावला. मी म्हटलं, ''हे सर्व डबे मात्र आज निकालात काढायचे, या बरण्यादेखील''. आणि कधी नव्हे ती ही कबूलही झाली. पितळ्याचे डबे, पत्र्याचे डबे आणि चिनी मातीच्या फिरकीच्या बरण्यांची 'उतरली'. त्यांना उतरवून मीही पायउतार झालो.
तो मेळावा पाहून ही म्हणाली, ''रोज दहा भंगारवाले दिसतात येता जाता. आज एक फिरकायचा नाही''.
''म्हणजे या गोष्टी भंगारात विकणार तू ?''
''नाहीतर काय मॉलमध्ये?'' ही कधीकधी कमॉल करते.
''चल, मी आंघोळीला जातो.''
''मी नाही करणार एवढ्यात आंघोळ''
''कां?''
''मला पार्लरमध्ये जायचंय, तू घे आंघोळ उरकून.''
मी आंघोळीला गेलो. तेव्हा अंगघोळ असा तर मूळ शब्द नसेल या विचारानं मी न्हाऊन निघालो. मी टॉवेलात स्वतःला गुंडाळून आलो तेव्हा एक नव्वारी साडीतली बोहारीण भंगारच्या आयटेम्सचं इन्सपेक्शन करत बसली होती.
''येवढंच, कपडे न्हाईत कां?''
हे वाक्यं तिनं माझ्याकडे बघून टाकलं असावं. हिनं मला नजरेनं कापडं चढवण्याचा आदेशभावजी दिला.
''बोल, किती देशील?''
''वीस.''
''काय?''
''ट्वेंटी.''
''एवढे कमी?''
''येवढी जुनी भांडी भंगारातबी कुणी घेत न्हाई, बाई.''
''तीस रुपये दे आणि उचल सगळी भांडी.''
''बाई, कशापायी टैम्पास करता?''
''राहिलं.आम्हाला भांडी द्यायचीच नाहीत.''
बोहारणीनं उत्तिष्ठ केलं. मी गोंधळलो. मी हिच्याकडे पाहिलं. ही म्हणाली, ''तुझा मान ठेऊन पाच रुपये कमी करते. पंचवीस दे.''

''बाई, परवडलं असतं तर तीस रुपये द्यायलाही मला आवडलं असतं...पण..'' माझ्या मनात आलं की हिला सांगावं की गेल्या आठवड्यात वेटरला टीप दिली पंचवीस रुपयांची. इथे पाच रुपयांनी काय होणार आहे ?..पण गप्प बसलो. बोहारीण असली तरी ती बाई होती, दुसऱ्या बाईची बाजू घेतली की संपलंच सगळं..

''साहेब, जरा हात लावा नां..''

मी तेच ऐकलं जे ती बोलली..?

मी तिच्याकडे पाहिलं. ती तिची टोपली तिच्या डोक्यावर चढवायला मदतीचा हात मागत होती. ती डोक्यावर टोपली घेऊन निघाली. मी डबे, बरण्या मुक्काम करणार म्हणून चिंताग्रस्त होतो. बोहारीण जाता जाता जे म्हणाली ते मला नीटसं कळलं नाही.

बोहारीण बाहेर पडल्यावर मी हिला म्हणालो.

''काय मोठा फरक पडणार होता पाच रुपयानं ?''

''खरं आहे. काळ सोकावतो नां पण ?''

''पुन्हा आता हे माळ्यावर टाकणार नाही''..मी निक्षून सांगितलं.

''येईल दुसरं कोणी. वीस रुपये म्हणजे काहीच नाहीत.''

''मी तर काहीच घ्यायचे नाही म्हणत होतो.''

''तुम्ही पैसे उधळायलाच निघालात ''

''जेवायला काय आहे ?'' मी विषय बदलला.

''तू म्हणशील ते''

''म्हणजे..हॉटेलात जायचं ?''

''होय, आवराआवरी झाल्यावर स्वयंपाक करायचा नाही हा शिरस्ता आहे.'''

''मला कंटाळा आलाय बाहेर पडण्याचा.''

''मग घरीच मागवू.''

''तू पिठलं टाक.''

''सरतेशेवटी मी जेवणार पार्लरमधून आल्यावर'' असं हिनं जाहीर केलन् आणि चालती झाली.

................*(या कथेचा शेवट वाचकांनी करुन पोस्टाने अथवा इमेलद्वारे पाठवावे. अंतिम तारीख ३० डिसेंबर २०१४)*


जगाच्या पाठीवर कुठेही जा, मात्र

**ट्रॅव्हल इन्शुरन्स पॉलिसी**

आमच्याकडूनच घ्या



- **वय वर्षे ८५ पर्यंत वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.**
- **पॉलिसी ५०,००० डॉलर्सपासून ५ लाख डॉलर्सपर्यंत उपलब्ध.**
- **आम्ही कोणत्याही इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी देतो.**
- **प्रिमियमचे दर अत्यंत माफक**
- **पॉलिसीची संपूर्ण माहिती, त्याची संपूर्ण सेवा त्वरित देण्याची व्यवस्था करतो.**
- **आपला काही क्लेम असेल तर आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन करून आपली नुकसानभरपाई मिळेपर्यंत सेवा.**

श्री. अनंत पु. गोखले

**भ्रमणध्वनी : ९८६९५२६१५२**

**दूरध्वनी : २६८३२२३३**

इ-२/७०३ विजयनगर सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९

E-mail : anant2611@yahoo.co.in


# netका प्रपंच

**उतारवयाच्या एका सद्गृहस्थाची प्रार्थना**

देवा,मी वृध्दत्त्वाकडे झुकतो आहे हे तुला माहीतच आहे, मला मात्र त्याची जाणीव दे. बडबडण्याची माझी सवय कमी कर. आणि त्यातल्या हर एक विषयावर आणि प्रत्येक प्रसंगी मी बोललं पाहिजे ही माझ्यातली अनिवार इच्छा कमी कर. दुसऱ्यांना सरळ करण्याची जबाबदारी फक्त माझीच व त्यांचे प्रश्न दखल घेऊन मीच सोडवले पाहिजेत अशी प्रामाणिक समजूत माझी होऊ देऊ नकोस.

टाळता येणारा फापटपसारा व जरुर नसलेल्या तपशीलाचा पाल्हाळ न लावता शक्य तितक्या मुद्यावर येण्याची माझ्यात सवय निर्माण कर. इतरांची दु:खन, वेदना शांतपणे ऐकण्याकरता मला मदत करच पण त्यावेळी माझं तोंड शिवल्यासारखं बंद राहू दे. अशा प्रसंगी माझ्यात निराशा वैफल्याचे रडगाणे ऐकवण्याचा माझी वाढती सवय कमी कर.

केव्हातरी माझीही चूक होऊ शकते, कधीतरी माझाही घोटाळा, गैरसमजूती होऊ शकतात याची जाणीव माझ्यात ठेव. देवा, अगदी शेवटपर्यंत माझ्यात थोडासा तरी प्रेमाचा ओलावा, गोडवा, लाघवीपणा राहू दे. मी संत महात्मा नाही. हे मला माहीत आहे पण बेरकी, बिलंदर, खडुस म्हातारा म्हणून मरू नये अशी माझी इच्छा आहे.

विचारवंत होण्यास माझी ना नाही पण मला लहरी करू नकोस. दुसऱ्याला मदत करण्याची बुध्दी आणि इच्छा जरुर मला दे पण गरजवंतावर हुकमत गाजवायची इच्छा मला देऊ नकोस. शहाणपणाचा महान ठेवा माझ्याकडे आहे अशी प्रामाणिक खात्री माझी असूनसुध्दा परमेश्वरा, ज्यांच्याकडे खरा सल्ला मागता येईल आणि खांद्यावर डोकं ठेवून रडता येईल असे मोजके का होईना पण काही सच्चे मित्र मला दे. एवढीच माझी प्रार्थना आहे.

@@@

प्रेषक - सौरभ वैशंपायन

**स्वयम् मध्ये आपल्याला सहभागी होण्यासाठी खालील सदरे आहेत. आपले साहित्य पुढील पत्त्यावर पाठवावे.**

स्वयम् संपादकीय मंडळ,
ब्राह्मण सेवा मंडळ,
भवानीशंकर रोड, दादर (प),
मुंबई ४०० ०२८.

## सभासदांसाठी महत्त्वाचे


- आपली ओळखपत्रे संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावीत.
- अंक ईमेल ने हवा असल्यास कळवावा.
- संपादक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

## netका प्रपंच

नेटवर अनेक अनामिक आपल्याला काही बाही पाठवत असतात. त्यातले काही वेचक उतारे, कथा आपण स्वयम् ला पाठवू शकतात. पण मजकूर मराठीतच हवा. हा मजकूर bsmandl@gmail.com 'स्वयम् ' साठी लिहून पाठवावा ही विनंती.





स्वयम् अधिकाधिक सुंदर आणि वाचनीय व्हावा यासाठी वाचक सूचना, कल्पना, रचना सुचवू शकतात.




या सदरात एकेक कथा प्रकाशित करू, ज्याला शेवट नसेल. तो वाचकांना करायचा आहे. आणि २५ तारखेपूर्वी 'संपादक, स्वयम्' या पत्त्यावर पाठवायचा आहे. तो पाठवताना कथेचा पोत, शैली कायम ठेवण्याचा प्रयत्न करावा. यथायोग्य शेवटांना प्रसिद्धी दिली जाईल आणि प्रेषकाचा उल्लेख केला जाईल.




एखादा सभासद निवर्तला असेल आणि त्याच्या नावाने अद्याप अंक येत असेल तर तो बंद करण्याविषयी पोस्टकार्ड लिहून कळवा. तसेच, आपण राहण्याचा पत्ता बदलला असेल तर तसे कळवावे.




दैनंदिन जीवनात आपण एकमेकांशी बोलता बोलता ''हे करायला हवं कुणीतरी''असं बोलून जातो. तो विचार तिथेच संपतो. या सदरात आपल्या मनातल्या अशा कल्पना बिनदिक्कत लिहून पाठवा.





स्वयंपाकघरात, कचेरीत, संस्थेत काम करीत असताना अनुभवाप्रमाणे काम प्रभावशाली होण्यासाठी काही पद्धती आपण अवलंबतो, ज्यामुळे वेळ, पैसा यांची बचत होते, काम सुबक होतं. अशा अनेक गोष्टी आपण 'स्वयम्' च्या वाचकांसमवेत 'शेअर' करू शकता. पुढच्या अंकात त्याला तुमच्या नावानिशी प्रसिद्धी देऊ.

## मागे एकदा

या सदरात वाचक अविस्मरणीय घटना शब्दबद्ध करुन देवू शकतात. त्या हृदयस्पर्शी, माणुसकीचे दर्शन घडवणाऱ्या, माणसाच्या स्वभावाचं दर्शन घडवणाऱ्या किंवा निखळ मनोरंजक असाव्यात.

थोडे कोडे - उत्तरे
१. शूरा मी वंदिले
२. ले
३. निळू फुले
४. वाजे पाऊल आपुले
५. गेले ते दिन गेले
६. प्रशांत दामले
७. शोले
८. आनंद साधले
९. वैभव मांगले



# गतवर्षाचा चित्रमय आढावा




प्रजासत्ताक दिन
आणि
संक्रमण २०१४



















दीपअमावस्या







गणेशोत्सव २०१४









वर्धापनदिन -३० एप्रिल २०१४



श्रीसत्यनारायणपूजा



सार्वजनिक व्रतबंध - मे २०१४



शारदोत्सव २०१४



कीर्तन स्पर्धा २०१४







कोजागरी पौर्णिमा २०१४



